दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ११० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२० जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## काँग्रेसमधील खदखद वाढली! असंतुष्ट राजीनामे देण्याच्या तयारीत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या अनेक दिवसांपासून राज्यातील सत्तासंघर्ष अधिकाधिक तीव्र होताना पाहायला मिळत आहे. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे नवे सरकार स्थापन झाल्यापासून महाविकास आघाडी टिकणार की फुटणार यावरून राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागल्या आहेत. यातच आता काँग्रेसमधील काही नेत्यांची खदखद वाढल्याचे सांगितले जात असून, असंतुष्ट नेते थेट राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत. एवढेच नव्हे तर, ते अध्यक्षा सोनिया गांधी यांची भेटही घेणार असल्याचे सांगितले जात आहे.

प्रदेश प्रतिनिधींच्या निवडीवरून काँग्रेस असंतुष्टांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. पक्षश्रेष्ठी सोनिया गांधी यांना भेटण्याची तयारी त्यांनी केली असून, वेळप्रसंगी पदाधिकारीपदाचा राजीनामा देण्याचा निर्धार केला आहे. प्रदेश काँग्रेसच्या प्रतिनिधींची संकेतस्थळावरील एक यादी व्हायरल झाली. नागपुरातील यादी बाहेर येण्यापूर्वीच नावांवर वाद सुरू झाला. यानंतर असंतुष्टांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या. यानंतर या गटाची दीड तास आमदार निवासात बैठक झाली.

### उरण नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या अन्याय्य निलंबनाच्या निषेधार्थ

# २२ जुलैला उरण मुख्याधिकाऱ्यांच्या विरोधात नगरपालिकेवर निषेध मोर्चा

**दै.रायगड नगरी । उरण**

**उरण नगरपरिषदेत कार्यरत असलेले आणि सुपरिचित सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार आणि कार्यतत्पर कर्मचारी मधुकर भोईर यांनी कार्यालयीन कामकाजात कुठलीही कसूर केलेली नसताना, केवळ काही सामाजिक आंदोलनात सहभागी होत असल्याच्या कारणावरून नगर परिषदेचे कर्मचारी संतोष पवार व मधुकर भोईर यांना उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी नियमबाह्य पद्धतीने आणि वैयक्तिक आकसापोटी निलंबीत केलेले आहे. त्यामुळे २२ जुलै २०२२ उरण नगर परिषदेवर मोर्चा काढण्यात येणार आहे.**

संतोष पवार हे उरण तालुक्यातील एक सेवाभावी कार्यकर्ते म्हणून सर्वांना परिचित आहेत. नगरपालिकेचे कर्मचारी म्हणून त्यांनी पालिकेच्या प्रत्येक विभागात उत्कृष्ट सेवा दिलेली आहे. आपल्या नियत कर्तव्याच्या पलिकडे जाऊनही प्रसंग पडेल तेव्हा पालिकेच्या सेवेसाठी ते सदैव तत्पर असतात. उरण शहरातील जनता मागील ३० वर्षापासून त्यांच्या सेवेची साक्षीदार आहे. तालुक्यातील कुणावरही वैयक्तिक संकट आले किंवा नैसर्गिक आपत्ती ओढवली तर संतोष पवारांचा अशा प्रसंगी स्वयंस्फूर्त पुढाकार असतो. तालुक्यातील इतर शासकिय यंत्रणा आणि कर्मचारी यांनाही त्यांच्या या कार्याची ओळख आहे. मार्च २०२० मध्ये उद्भवलेल्या कोरोना महामारीच्या साथीत सापडलेल्या कोरोना रूग्णांना आणि त्यांच्या




नातेवाईकांना स्वतःचा जीव धोक्यात घालून त्यांनी जे सहकार्य केले ते उरणची जनता कधीच विसरणार नाही.

उरण तालुक्याचे कोरोना नोडल ऑफर म्हणून त्यांनी आपला मुक्काम बोकडविरा येथील कोरोना सेंटरमध्ये ठेवला होता. रात्री उशिरापर्यंत राहून ते प्रत्येक कोरोना रुग्णांची व्यक्तिशः काळजी घेत होते. ही सेवा त्यांनी जवळपास दोन वर्षे दिली. अशा या निरलस सेवाभावी कर्मचाऱ्याला केवळ हॉस्पिटलच्या मागणीसाठी, पर्यावरणाच्या रक्षणासाठी, शैक्षणिक कार्यासाठी आणि शेतकरी-कामगार यांच्या अन्यायाविरोधात झालेल्या आंदोलनात सहभागी झाले म्हणून निलंबीत करण्यात आले आहे. विशेष म्हणजे त्यांनी आपल्या कार्यालयीन कामकाजात कसूर केली म्हणून सदरहू मुख्याधिकारी यांनी त्यांना सबळ कारण देऊन एकही नोटीस बजावलेली नाही. संतोष पवार हे उरण नगरपालिकेतील कर्मचारी आणि सफाई कामगारांचे नेतृत्व करतात. म्हणून कुणाच्या तरी दबावाखाली येऊन त्यांच्यावर ही अन्यायकारक कारवाई झालेली आहे.

मुख्याधिकारी यांनी दूसरे निलंबित केलेले कर्मचारी मधुकर भोईर हे सुद्धा नगरपालिकेचे कार्यतत्पर आणि कर्तव्यदक्ष कर्मचारी आहेत. गोर-गरीबांना ते आपल्या तुटपुंज्या पगारातून मदत करत असतात. त्यांच्या एखादे अनाथ निदर्शनास आल्यास त्याचे पालकत्व स्वीकारून सक्षम होईपर्यंत त्या अनाथ मुलांचे पालन पोषण मधुकर भोईर करतात. त्यांनी १० - १२ अनाथ मुलांना अशाप्रकारे आश्रय दिलेला आहे. मधुकर भोईर आणि इतर तीन कर्मचारी यांनी त्यांच्या ड्युटीच्या वेळेत रात्री १:३० ते २:०० च्या अर्ध्या तासाच्या वेळेत फोन उचलला नाही या केवळ एका कथित कारणासाठी केवळ एकटे मधुकर भोईर यांनाच निलंबीत केले आहे. यावरून त्यांचा दुजाभाव दिसून येतो. त्याआधी कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी मधुकर भोईर यांना एकदाही नोटीस दिलेली नाही. मधुकर भोईर हे सफाई कामगारांचे नेतृत्व करतात म्हणून केवळ त्या आकसापोटी निलंबित केलेले आहे.

> जनतेच्या सेवेसाठी नेहमी तत्पर असलेल्या कर्तव्यनिष्ठ कर्मचाऱ्यांविरोधात वरीलप्रमाणे आकसाने, सुडबुद्धीने आणि हुकुमशाही पद्धतीने कारवाई होत असेल तर त्याचा विपरित परिणाम इतर नगरपालिका कर्मचारी वर्गावर होऊन शहरातील विविध सेवांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होईल आणि उरणवासीयांचे दैनंदीन जीवन प्रभावित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शहरातील सजग नागरिक म्हणून सदर मुख्याधिकारी यांचा निषेध करण्यासाठी विविध सामाजिक संस्था संघटनांनी मुख्याधिकारी संतोष माळी यांचा निषेध करण्यासाठी शुक्रवार दि. २२ जुलै २०२२ रोजी उरण नगरपालिकेवर मोर्चाचे आयोजन केले आहे. सदर मोर्चा आनंदनगर येथून १०:३० वाजता निघेल आणि राजपाल नाका, गणपती चौक, महात्मा गांधी चौक, नगराज नाका मार्गे नगरपालिका कार्यालयाकडे प्रस्थान करेल. सदरहू मोर्चाप्रसंगी राज्यस्तरावरील विविध कामगार आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मार्गदर्शन करणार आहेत.

> उरण नगर परिषदेचे कर्मचारी संतोष पवार व मधुकर भोईर यांच्यावर कोणत्याही सूड बुद्धिने किंवा आकसापोटी कारवाई केलेली नाही. संतोष पवार किंवा मधुकर भोईर यांच्याविषयी माझ्या मनात कोणत्याही प्रकारचा राग नाही. शासकीय नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी तसेच प्रशासनाचे नियम पाळत नसल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केलेली आहे. या अगोदर त्यांना नोटीसा सुद्धा देण्यात आलेल्या आहेत. तसेच तोंडी सुद्धा सांगण्यात आलेले आहेत. वारंवार सांगून सुद्धा सदर कर्मचारी शासकीय नियमांचे पालन करत नसल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना विविध सामाजिक संस्थेच्या आंदोलनात, उपोषणात सहभागी होऊन शासनाच्या विरोधात आंदोलन, उपोषण करता येत नाहीत. घोषणाबाजी करता येत नाही. सदर कर्मचाऱ्यांवर शासकीय नियमानुसार योग्य ती कारवाई केलेली आहे. त्यांच्यावर अन्याय झाला आहे असे वाटल्यास सदर कर्मचारी योग्य प्राधिकरणाकडे किंवा न्यायायलयात आपली बाजू लोकशाही पद्धतीने व कायदेशीरपणे बाजू मांडू शकतात.
>
> **संतोष माळी, मुख्याधिकारी, उरण नगर परिषद**

## पनवेलजवळ मुंबई पुणे एक्सप्रेसवर ट्रक आणि कारचा भीषण अपघात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चिखले रेल्वे ब्रिज जवळ मुंबई पुणे एक्सप्रेस हायवे वर दोन ट्रक आणि दोन फोर व्हीलरचा अपघात झाला आहे. चार वाहनांनी पाठीमागून दिलेल्या धडकेत ट्रक चालक जखमी झाला आहे. ट्रक क्रमांक के ए २२ डी १९५८ यांच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रवींद्र गायकवाड (भिवरी, पुरंदर) हे एच. १२ एस. एल. ८२०९ घेवून पुणे येथून मुंबईकडे जात असताना ट्रक क. के.



ए. २२ डी. १९५८ चे चालक साहेबराव किसन बजबळकर याने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, व रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून व भरधाव वेगात चालवले. आणि ट्रक क्र. एम. एच. ४६ एआर.२६७८ या वाहनास पाठीमागुन धडक दिली. त्यामुळे सदरचे वाहन रवींद्र गायकवाड यांचे तसेच वाहन क्र. एम. एच. ४६ टी. ५२०० ला पाठीमागुन धडकुन वाहनांचे नुकसान झाले. तसेच या अपघातात ट्रक क्र. एम. एच. ४६ ए.आर. २६७८ वरील चालक जखमी झाला आहे. म्हणुन ट्रक क्र. के.ए. २२ डी. १९५८ चे चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तळोजे भुयारी मार्गाची रेल्वे अधिकाऱ्यांनी केली पाहणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा रेल्वे फाटकवर परिसरातील भुयारी उभारलेल्या भुयारी मार्गात पहिल्याच पावसात जवळपास चार फुटापर्यंत पाणी तुंबल्याने तळोजा वसाहत मधील रहिवाशांना तीन किलोमीटर अंतर पार करून पेंधर रेल्वे फाटक मार्गावरुन ये जा करावी लागली होती. या विषयी रहिवाशांनी रेल्वे प्रशासनाकडे तक्रार केली होती. सदर तक्रारीची दखल घेवून 'मध्य रेल्वे'चे अतिरिक्त उपविभागीय व्यवस्थापक प्रदीप पोळ यांनी पाहणी करून भुयारी मार्गात पाणी येऊ नये यासाठी उपाययोजना करावी, असे निर्देश अभियंता विभागाला दिले.



दिवा-पनवेल रेल्वे मार्गावर तळोजा वसाहतीच्या प्रवेशद्वारावर असलेल्या रेल्वे फाटकच्या दोन्ही बाजुने होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी

.../२

## संक्षिप्त...

### राज्याच्या प्रगतीसाठी लोकहिताचे निर्णय : मुख्यमंत्री

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. राज्याच्या उत्कर्षासाठी शासनाने लोकहिताचे महत्वपूर्ण निर्णय घेतल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

मुख्यमंत्री शिंदे दोन दिवसांच्या दिल्ली भेटीवर असून त्यांनी सर्वोच्च न्यायालयात इतर मागास वर्गाच्या (ओबीसी) आरक्षणाबाबत होणाऱ्या सुनावणी संदर्भात वकील, विधीज्ञ आणि तज्ज्ञांची भेट घेऊन सखोल चर्चा केली. तसेच, लोकसभेत गटनेते व पक्ष प्रतोद बदलण्यासंदर्भात आज झालेल्या निर्णयाविषयी माहिती देण्यासाठी महाराष्ट्र सदनात आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी खासदार सर्वश्री राहूल शेवाळे, डॉ.श्रीकांत शिंदे, हेमंत गोडसे, सदाशिवराव लोखंडे, कृपाल तुमाने, भावना गवळी, प्रतापराव जाधव, संजय मंडलीक, धैर्यशील माने, हेमंत पाटील, श्रीरंग बारणे, राजेंद्र गावीत उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, जनहिताचे निर्णय घेऊन सर्वसामान्य जनता, शेतकरी व समाजाच्या सर्व घटकांच्या विकासासाठी राज्य शासन कार्य करीत आहे. नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रूपयांचे प्रोत्साहनात्मक अनुदान देण्याचा निर्णय, पेट्रोल-डिझेलचे दर अनुक्रमे ५ आणि ३ रूपयांनी कमी करण्याचा निर्णय, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीचे निर्णय, अधिकाधिक जमीन सिंचनाखाली आणण्याचा तसेच प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय असे काही महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

## रिक्षावाल्याला मारहाण करून लुटले

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील पोटलज फाटा येथे एका रिक्षावाल्याला चार जणांनी मारहाण करून लुटल्याची घटना घडली आहे.

याबाबत पाली पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार रिक्षाचालक प्रमोद गुजर (वय ३९) हे खोपोली वरून आपली रिक्षा घेऊन एकटेच बहिरीचीवाडी (पोस्ट भिरा, तालुका माणगाव) येथे जात होते. यावेळी पाली नांदगाव रस्त्यावर पोटलज फाटा येथे आले असता चार अज्ञात इसमांनी त्यांची रिक्षा अडवली आणि पेट्रोलसाठी पैसे मागितले. यावेळी रिक्षा चालक प्रमोद गुजर यांनी पैसे देण्यास नकार दिला असता या चार इसमानी प्रमोद गुजर यांना रिक्षातून बाहेर रस्त्यावर खेचले आणि रस्त्याच्या बाजूला झाडाजवळ नेऊन खाली पाडले. तसेच सर्वांनी मिळून त्यांचे डोके रस्त्यावर आपटून दुखापत केली. तसेच रिक्षाचालक प्रमोद गुजर यांच्या खिशातील पैशाचे पाकीट काढून त्यातील तीन हजार रुपये काढले व दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून घेतला. या गुन्ह्यातील दोन आरोपींना सोमवार (ता.१८) दुपारी तीनच्या सुमारास पाली पोलिसांनी अटक केली आहे.

## माणगावमध्ये डोळ्यात मसाला टाकून, चाकु हल्ला करीत चोरी

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव मध्ये चोरीची खळबळजनक घटना घडली आहे. मौजे मोरबा ते साईकडे जुने रोडवर येथील रविंद्र दत्ताराम अधिकारी, वय ४० राहणार साईकोंड माणगांव हे दुकानदार, आपले दुकान बंद करून सोबत रोख रक्कम असलेली काळ्या रंगाची गळ्यात अडकविण्याची बॅग घेऊन स्वतःची गाडी क्रमांक एम एच ०६/ बी एम/१६०१ ही चालु करून गाडीचे डाव्या बाजुचे सीटवर ती पैशाची बॅग ठेवुन गाडी चालवीत मोरबा ते साईकडे जाणारे जुने रोडने जात असताना, रोडवर मधेच नायलॉनची जाडी रस्सी आडवी बांधली असल्याचे दिसल्याने त्यांनी गाडी थांबवली असता गाडी जवळ एक अज्ञात चोरटा इसम आला व त्याने त्यांच्या डोळ्यात मसाला पावडर मारून, हातात असलेल्या चाकुने हल्ला केला.

परंतु सुदैवाने तो चुकवुन कोणतीही दुखापत न झाल्याने दत्ताराम हे गाडी मधून बाहेर पडून पळुन गेले. त्या दरम्यान या अज्ञात चोरट्याने त्यांचे गाडीतील पैशाची बॅग संमती शिवाय जबरी चोरी केली आहे. म्हणून त्यांनी मंगळवारी दि. १९ जुलै रोजी माणगांव पोलीस स्टेशन मध्ये फिर्याद दाखल केल्याने, पोलीसांनी कॉ.गु.रजि. नंबर २०७/२०२२ भा.द.वि. कलम ३४१,३९४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. चोरट्याने रोख रक्कम एकुण रुपये ९२,०००/- मात्र असलेली पैशाची काळी बॅग चोरून नेली आहे. माणगांवचे पोलीस उप अधिक्षक प्रवीण पाटील व वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचे मार्गदर्शनात स.पो.नि. लहांगे, स.पो.नि. मोहिते हे अधिक तपास करीत आहेत.

## पोलादपूरच्या कशेडी घाटात चोळई येथे अपघातांची मालिका सुरूच

### पोकलेन घेऊन जाणाऱ्या ट्रेलरची डंपरला धडक

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटातील चोळई गावातील अपघातांची मालिका चौपदरीकरणानंतरही अद्याप थांबलेली दिसून येत नाही. सोमवारी दुपारी पोकलेन घेऊन जाणाऱ्या ट्रेलरची डंपरला धडक बसल्याने झालेल्या अपघातामध्ये चार जण जखमी झाल्याची माहिती पोलादपूर पोलीस ठाण्याकडून देण्यात आली.

सोमवार दि. १८ जुलै २०२२ रोजी दुपारी सव्वातीन वाजण्याच्या सुमारास खेडकडून मुंबईच्या दिशेने ट्रेलर (क्रमांक आरजे ०१ जीसी ३२०९) मधून पोकलेन मशीन (क्रमांक आरजे १४ जीई ३८१९) घेऊन तीव्र वळण उतारावरून वेगाने येत असताना चालकाचा ताबा सुटून ट्रेलर आणि पोकलेन मशीनसह पोलादपूरकडून धामणदिवीच्या दिशेने जाणाऱ्या डम्परला समोरासमोर रस्त्याच्या मधोमध धडक बसली. यामुळे डम्पर आणि ट्रेलर ही दोन्ही वाहने रस्त्याच्या


.../२



## मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडेंना ईडीकडून अटक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडे यांना अटक करण्यात आली आहे. अंमलबजावणी संचलनालय अर्थात ईडीने पांडेंना बेड्या ठोकल्या आहेत. एनएसई (नॅशनल स्टॉक एक्स्चेंज) मधील कर्मचाऱ्यांच्या कथित फोन टॅपिंग प्रकरणाशी निगडीत मनी लॉड्रिंग प्रकरणात पांडेंवर कारवाई करण्यात आली आहे. २००९ ते २०१७ या काळात पांडेंनी बेकायदेशीर पद्धतीने फोन टॅपिंग केल्याचा आरोप आहे. ५ जुलै रोजी मनी लॉड्रिंग प्रकरणात चौकशीसाठी ईडीने संजय पांडेंना सर्वप्रथम बोलावलं होतं, त्यानंतर आजही दिवसभर चाललेल्या चौकशीअंती ईडीने पांडेंना अटक केली.



संजय पांडे यांनी २००१ मध्ये पोलीस खात्यातून राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांनी आयसेक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ही आयटी कंपनी सुरु केली होती. २००६ मध्ये पांडे पुन्हा पोलीस सेवेत रुजू झाले, त्यावेळी त्यांनी आपली आई आणि मुलाला कंपनीचे संचालक केले. पांडेंच्या कंपनीला एनएसईचे सर्व्हर, संगणकीय यंत्रणा आणि माहिती तंत्रज्ञान वापरण्यात आले.

सीबीआयच्या आरोपानुसार नारायण आणि रामकृष्ण, वाराणसी आणि हल्दीपूर यांनी २००९ ते २०१७ दरम्यान एनएसई कर्मचार्यांचे फोन बेकायदेशीरपणे टॅप करण्याचा कट रचला. ज्यासाठी त्यांनी २००१ मध्ये पांडे यांनी स्थापन केलेल्या ISEC सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला कामावर ठेवले होते. कथित बेकायदेशीर फोन टॅपिंगसाठी पांडेंच्या कंपनीला ४.४५ कोटी रुपये मिळाल्याचा सीबीआयचा आरोप आहे. एनएसई कर्मचाऱ्यांशी संबंधित फोन टॅपिंग प्रकरणाशी निगडीत मनी लॉड्रिंग प्रकरणात ईडी आणि सीबीआय यांनी पांडेंवर गुन्हा दाखल केला होता. सीबीआय आणि आता ईडीने पांडे आणि त्यांची दिल्लीस्थित कंपनी आयसेक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, एनएसईचे माजी व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) नारायण आणि रामकृष्ण, कार्यकारी उपाध्यक्ष रवी वाराणसी आणि प्रमुख महेश हल्दीपूर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. चित्रा रामकृष्ण यांच्या काळात झालेला एनएसईतील गैरव्यवहार लेखापरीक्षणात का उघड झाला नाही, याची चौकशी करण्यात आली.

# जीएसटीचा आसूड

पाच वर्षांपूर्वी, एक जुलै २०१७ रोजी देशासाठी समान अशी वस्तू आणि सेवा कराची प्रणाली (जीएसटी) अमलात आली, तेव्हा जणू देशाला नवे आर्थिक स्वातंत्र्य मिळत असल्याचा माहोल तयार करण्यात आला. मध्यरात्री खास कार्यक्रम करण्यात आला. ही जीएसटीची कल्पना जुनीच असली, तरी विरोधात असताना विरोध आणि सत्तेत आल्यावर समर्थन, असा चमत्कारही काहींनी करून दाखविला. या पार्श्वभूमीवर जीएसटी आता स्थिरावला असून, जूनमध्ये या कराचे संकलन एक लाख ४४ हजार कोटी रुपयांवर गेले आहे. असे असताना, जीएसटी परिषदेने कोट्यवधी सामान्य नागरिकांना नवा तडाखा देण्याचे काहीही कारण नव्हते. करोनातून सारा समाज बाहेर पडतो आहे. कोट्यवधी नागरिक करोनापूर्व काळापेक्षा गरीब झाले आहेत. लक्षावधी कुटुंबे गरिबीच्या रेषेच्या खाली पुन्हा ढकलली गेली आहेत. असे असताना दही, तांदूळ, गहू, कडधान्ये, एलईडी दिवे अशा सामान्य नागरिकांच्या जीवनावश्यक चिजांवर जीएसटी लादण्याची काय गरज होती? केंद्र सरकार याबाबत असंवेदनशीलतेने वागत असून, संसदेच्या चालू अधिवेशनात विरोधकांनी जोरदार जाब विचारायला हवा. सोमवारी राज्यसभेत काँग्रेसने हा मुद्दा उपस्थित केला. तेव्हा कामकाज स्थगित करण्यात आले; मात्र दोन्ही सभागृहांमध्ये विरोधकांनी एकत्र येऊन सरकारला पुन्हा धारेवर धरण्याची गरज आहे. कोणत्याही प्रगत अर्थव्यवस्थेत थेट करांचे प्रमाण जास्त हवे. प्रत्यक्ष करदाते हे श्रीमंत असतील, तर त्यांच्यावर थेटपणे अधिक कर घ्यावा. अप्रत्यक्ष करांचे प्रमाण तुलनेने कमी असावे. याचे कारण, गरीब आणि मध्यमवर्ग कोणतीही वस्तू खरेदी करतो, तेव्हा अप्रत्यक्ष करांमुळे त्याच्या खिशावरचा बोजा वाढत जातो. तो वाढला, की त्याचे राहणीमान क्रमाक्रमाने घसरत जाते. मोदी सरकारला सत्तेत येऊन आठ वर्षे झाली, तरी प्राप्तिकर भरणाऱ्या व्यक्ती आणि कंपनी कर भरणाऱ्या कंपन्या यांची एकत्रित संख्या केवळ आठ कोटी २२ लाख आहे. ही आकडेवारी अर्थमंत्र्यांनीच संसदेत दिली आहे. एकीकडे, ४० कोटींचा मध्यमवर्ग असल्याचा टेंभा मिरवायचा आणि दुसरीकडे, लोकसंख्येच्या दहा टक्के नागरिकांकडूनही प्रत्यक्ष कर वसूल करायचा नाही, हे केंद्र सरकारचे फार मोठे अपयश आहे. या अपयशावर बोट ठेवण्याचे मुख्य कारण म्हणजे, प्रत्यक्ष करवसुलीत येणारे हे अपयश केंद्र सरकार अप्रत्यक्ष करांमध्ये वाढ करून झाकते आहे. जीएसटीचे जाळे सतत वाढवत न्यायचे, पाच टक्क्यांमधील वस्तू १२ आणि १२ टक्क्यांमधील वस्तू १८ टक्क्यांमध्ये न्यायच्या, असा खेळ जीएसटी परिषद खेळते आहे. यातून, देशात काळ्या बाजाराला आपण प्रोत्साहन देतो आहोत, याचेही भान सरकारला उरलेले नाही. जीएसटीची नोंद आणि परिपूर्ती न करण्याची शेकडो उदाहरणे उजेडात येत आहेत. सरकारने ही कररचना परवडणारी ठेवली नाही, तर देशातील काळा बाजार कधीही संपणार नाही. जीएसटीवर चर्चा झाली, तेव्हा वैद्यकीय सेवा आणि उपकरणे यांना जीएसटीमधून वगळावे, अशी सूचना पुढे आली होती. तसे करणे शक्य नसेलही; मात्र आता सरकारने रुग्णालयांमधील रुग्णखाटांवर जो जीएसटी बसविला आहे, तो तर्कदुष्ट आहे. रुग्णालये आधीच बहुतेक सगळ्या वस्तूंवर जीएसटी भरत असतात; तेव्हा रुग्णखाटांच्या बिलांवर नव्याने जीएसटी कशासाठी? आणि हा जीएसटी रुग्णालये शेवटी कोणाच्या खिशातून भरणार? मोठ्याच काय, मध्यम शहरांमध्येही अपघाती किंवा इतर गंभीर आजारांचे रुग्ण भरती होतात, तेव्हा रोज हजारो रुपयांचे बिल होते. तेव्हा १८ टक्के कर केवळ महाग रुग्णशय्यांवर असेल, हा सरकारी बचाव निरर्थक आहे; शिवाय एक हजाराच्या आत रोजचा आकार असणाऱ्या रुग्णशय्यांवरही जीएसटी आला आहेच. मग या रुग्णशय्या गरीब वापरत असतील, तर त्यांना तरी निदान करातून सोडायला हवे होते. कोणताही अप्रत्यक्ष कर कुणीही स्वतःच्या खिशातून भरत नाही. तो नफ्याचे प्रमाण कायम राखण्यासाठी 'पास' करण्याची वृत्ती असते. ती अयोग्यही नाही; मात्र यातून अनिष्ट महागाईचे दुष्टचक्र सुरू होते. या दुष्टचक्राचा सर्वांत जास्त आणि जीवघेणा फटका समाजाच्या तळाशी अंगमेहनत किंवा रोजंदारी करून जगणारा जो वर्ग असतो, त्याला बसतो. अन्नधान्य, पीठ किंवा कडधान्ये ही ब्रँडेड आणि पॅकबंद असतील, तरच जीएसटी घेतला जाईल, असे सरकारने म्हटले आहे; मात्र एकीकडे कृषी आधारित उद्योगांना चालना द्यायची आणि दुसरीकडे, गूळ, डाळी किंवा धान्यांवर कर बसवायचा, यातून शेतकऱ्यांना तरी काय मदत होणार आहे? आज देशात दुग्धव्यवसाय घोर संकटात आहे. याकडे दुर्लक्ष करून दही, लस्सी यांच्यावरही जीएसटी बसविला आहे. पुढची जीएसटी परिषद होईल, तेव्हा भारतीय नागरिक श्वासातून घेत असलेल्या हवेवर आणि पीत असलेल्या पाण्यावर जीएसटी लादला जाणार नाही, अशी अपेक्षा आहे.

# रोहा तालुक्यातील बारा गावे अंधारात ; वीज सुरू करण्यासाठी निवेदन

**दै.रायगड नगरी । मुरुड**

रोहा तालुक्यातील दुर्गम ग्रामीण भागातील असलेली गावे गोपाळवट, फणसवाडी, वाघीरपट्टी, मसाडी, कांटी, केळघर, वांडरखोंडा, साटलेवाडी, आराळी, खडकी, वांदरखोंड असी सुमारे दहा ते बारा गावांचा विज पुरवठा गेल्या सहा दिवसांपासून खंडित झाल्याने आज अखेर ग्रामस्थांनी निर्णय घेऊन रोहा महावितरण कार्यालयावर धडक दिली व उपविभागीय अभियंता वाघमोडे यांना धारेवर धरले आणि विज पुरवठा सुरळीत करण्याबाबत निवेदन दिले आहे.

या अनेक दिवस सतत जाणाऱ्या विजेमुळे मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. अखेर ग्रामस्थांच्या सहनशीलतेचा अंत झाला. बारा गावातील ग्रामस्थ एकवटले व १७ जुलै रोजी सभा घेऊन रोहा महावितरण कार्यालयावर धडक द्यायची व महावितरण अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी १८ जुलै रोजी रोहा महावितरण कार्यालयात पोहोचले.

सहा सात दिवस विजपुरवठा खंडित झाल्याने झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी अनेकांना आर्थिक, शैक्षणिक, शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत यांची भरपाई द्यावी म्हणून महावितरण उपविभागीय अधिकारी वाघमोडे यांना धारेवर धरले व विज प्रवाह सुरू करण्यासाठी निवेदन दिले आहे.



# साने गुरूजी राष्ट्रीय स्मारकामध्ये वर्षारंग संपन्न

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव तालुक्यातील वडघर येथिल साने गुरूजी राष्ट्रीय स्मारकात 'वर्षारंग' हे पावसाळी संमेलन दि. १६-१७ जुलै रोजी अत्यंत उत्साहाने संपन्न झाले. राज्यभरातील तरूणाईचा भरभरून सहभाग हे या संमेलनाचे वैशिष्ट्य होते.

कोकणातील भात लावणीच्या पार्श्वभूमीवर साने गुरूजी राष्ट्रीय स्मारकात दरवर्षी जुलै महिन्यात हे संमेलन आयोजित केले जाते. या वर्षी झालेल्या या संमेलनाचे उद्घाटन जेष्ठ पत्रकार तसेच स्मारकाच्या आंतर भारती कला भवनाचे अध्यक्ष युवराज मोहिते यांनी सर्व सहभागीना सामील करुन घेत अत्यंत कल्पकतेने केले. यावेळी सहभागीनी उत्स्फूर्तपणे काढलेल्या मोर्चात 'आरे बचाव' च्या नाऱ्याने स्मारकाचा परिसर दुमदुमला. यावेळी सर्वांनी पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली.

दुपारी स्मारकाच्या शेतातील भात लावणीमध्ये सर्वांनी सहभाग घेतला. संध्याकाळच्या सांस्कृतिक सभेत सर्वांना खळखळून हसविणाऱ्या पु. ल. देशपांडे यांची चिंतनशील बाजू मांडणारा प्रयोगशाळा प्रस्तुत 'पुरुषोत्तम' हा अभिवाचन कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचे सादरीकरण तक्षील खानविलकर, सुमेध समर्थ आणि मल्हार शितोळे या नामवंत कलाकारांनी केले.

दुसऱ्या दिवशी सकाळी नेचर ट्रेल काढण्यात आली. वनस्पती परिचय, पक्षी निरक्षण याचे मार्गदर्शन मल्हार इंदुलकर यांनी सर्वांना केले. चिखलातील खेळ, रानभाज्या, गप्पा पावसातील गाणी, असा एकूण माहोल रंगला होता. राज्याच्या कानाकोपऱ्यातून शेतकरी, कष्टकऱ्यांच्या श्रमाचे मोल समजून घेण्यासाठी ज्येष्ठ नागरिक, तरूण-तरूणी, बालके, महिला यांनी लक्षणीय उपस्थिती दर्शविली होती. संमेलनाचा समारोप स्मारकाचे अध्यक्ष डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी केला. यावेळी सचिव राजन इंदुलकर, कोषाध्यक्ष माधुरी पाटील, माजी विश्वस्त वसंत एकबोटे, जयश्री सामंत, राष्ट्र सेवा दलाचे जेष्ठ कार्यकर्ते अलका एकबोटे, सुहास कोते, शशिकांत पाटील तसेच प्रा. अभिजित देशपांडे इ. उपस्थित होते. स्मारकाचे व्यवस्थापक राकेश यांच्या मार्गदर्शनाखाली युवा छावणीतील कार्यकर्त्यांनी या संमेलनाचे व्यवस्थापन सांभाळले. साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक समाजाला जोडणाऱ्या अश्या अनेक उपक्रमांचे आयोजन वेळोवेळी करत असते, याही वेळी कोरोना लॉकडाऊन नंतर आयोजित या कार्यक्रमाने हा परिसर फुलून गेला होता.

# पशुपालकांसाठी स्थानिक प्रशासन आणि पशूसंवर्धन विभागाने दाखविली कार्यतत्परता

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



रोहा तालुक्यातील मौजे पांगळोली येथील पशुपालकांनी पशूसंवर्धन विभाग, रोहा यांच्याशी दि.१७ जुलै रोजी संपर्क साधून गावातील पशू मृत पावल्याचे कळविले होते. ही माहिती मिळताच रोहा पशूसंवर्धन विभागाचे पथक घटनास्थळी त्वरित दाखल झाले होते. प्रथमदर्शी घटनास्थळी ०३ पशूंचे मृतदेह निदर्शनास आले. मात्र संध्याकाळची वेळ झालेली असल्याने व पुरेसा सूर्यप्रकाश नसल्याकारणास्तव या मृत पशूंचे शवविच्छेदन दि.१८ जुलै रोजी करण्याचा निर्णय घेण्यात आला. या पशूंच्या मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदनाचा अहवाल प्राप्त झाल्यावरच लक्षात येईल, असे तालुका पशू धन विकास अधिकारी डॉ.अक्षय सांगळे यांनी स्पष्ट केले होते.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या तातडीच्या निर्देशानुसार आज दि.१९ जुलै रोजी प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, उपायुक्त, जिल्हा पशुसंवर्धन डॉ. रत्नाकर काळे, जिल्हा परिषद जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.श्याम कदम, रोहा तहसिलदार कविता जाधव, तालुका पशू धन विकास अधिकारी डॉ.अक्षय सांगळे यांनी मौजे पांगळोली येथे प्रत्यक्ष भेट देऊन तेथील परिस्थितीचा संपूर्ण आढावा घेतला.

यावेळी उपस्थित ग्रामस्थांना पशूंच्या आरोग्याबाबत व सद्य:स्थितीत गुरांच्या घ्यावयाच्या काळजीच्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. सध्या या गावात पशूसंवर्धन विभागाच्या व स्थानिक प्रशासकीय यंत्रणेच्या तत्परतेने मागील दोन दिवसात एकही पशू दगावलेला नाही. तसेच ज्या पशूंवर उपचार करण्यात आले आहे, त्यांच्या आरोग्यात समाधानकारक सुधारणा झाल्याचेही आढळून आले आहे. तरी नागरिकांनी घाबरून जावू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पोलादपूरच्या कशेडी घाटात चोळई येथे अपघातांची मालिका सुरूच

कडेला पलटी झाली. यावेळी ट्रेलरमधील हिरालाल राधाकिशन चौधरी (वय १६ वर्षे) आणि प्रधान रामकिशन चौधरी (वय २३ वर्षे), दोघेही रा.समोद, ता.नसेराबाद, जि.अजमेर, राजस्थान तसेच डम्परमधील शंकर काशिनाथ पवार (वय ४० वर्षे, जोगेश्वरी गाडीतळ, पोलादपूर) आणि तुषार नीळकंठ सावंत (वय ३६ वर्षे, सह्याद्रीनगर, पोलादपूर) असे चौघेजण जखमी झाले. यावेळी काँग्रेस तालुका अध्यक्ष अजय सलागरे तसेच अन्य प्रवाशांनी घटनास्थळावरून जखमींना पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल केले. याप्रकरणी गुन्हा.र.नं. ५९-२०२२ नुसार ट्रेलरचा चालक प्रधान रामकिशन चौधरी याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सहायक फौजदार व्हि.जी.चव्हाण हे सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.

## तळोजे भुयारी मार्गाची रेल्वे अधिकाऱ्यांनी केली पाहणी

सिडको आणि रेल्वे प्रशासनाच्या माध्यमातून तळोजा रेल्वे फाटक शेजारी ५० कोटीहून अधिक रुपये खर्च करून भुयारी मार्ग उभारण्यात आला आहे. भुयारी मार्गातील पाण्याचा निचरा करण्यासाठी 'रेल्वे'ने ५० हॉर्स पॉवरचे एक आणि २५ हॉर्स पॉवरचे दोन पंप तसेच वीज पुरवठा खंडीत झाल्यास आपत्कालीन परिस्थितीसाठी २०० केव्हीचा जनरेटर या ठिकाणी सज्ज ठेवले आहेत. असे असताना देखील रेल्वे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तळोजा भुयारी मार्गात तीन ते चार फुटापर्यंत पाणीतुंबल्याने रहिवाशांना थेट तीन किलोमीटर मीटर अंतर पार करुन पेंधर रेल्वे फाटक मार्गे ये-जा करावे लागल्याने पेंधर मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. यावेळी काही रहिवाशांनी याची तक्रार 'मध्य रेल्वे'कडे केली होती.

सदर तक्रारीची दखल घेवून भुयारी मार्गात सिमेंट काँक्रीटच्या भिंतीतून मोठ्या प्रमाणात पाणी येत असल्यामुळे 'रेल्वे ' कडून केमिकल टाकून बंद करण्यात येत आहे. पाहणीच्या वेळी प्रदीप पोळ यांनी भुयारी मार्गात पावसाचे पाणी येवू नये या विषयी काळजी घावी. तसेच यावेळी पेंधर रेल्वे फाटकवर दुसऱ्या बाजूने उभारण्यात आलेल्या रेल्वे फाटकवर सिग्नल यंत्रणा आणि रेल्वे फाटक लवकर उभारण्यात यावे, असे निर्देश पोळ यांनी अभियंता विभागाला दिले.

### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : महोदरा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेल्या जमीन मिळकती मुळ जमीन मालकांकडून मी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : महोदर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गाव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| महोदर | दिलीपकुमार जसवंतराज शाह | १३६ | ०-४२-००<br>पोटखराबा ०-१४-००<br>एकूण क्षेत्र ०-५६-००<br>पैकी खरेदी क्षेत्र ०-४०-०० | ०.८७ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन मी वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करेन व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी या माझेवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १९/०७/२०२२

**सही/-**
**श्री.मायाशंकर शिवनाथ सिंह**
**बी-१२०६, मेरिडीयन को.ऑप.हौ.सो. लि., प्लॉट नं.२५-२७, सेक्टर नं.०६, नेरुळ नोड-३, नवी मुंबई-४००७०६**
**मो.नं.९८३३१६९६१७**

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.माया मजुमदार**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१०४७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०९/२०२२

१) श्रीमती.प्रिया राजेश देरा
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.भव्य राजेश देरा
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.मनन राजेश देरा
वय : २४ वर्षे, धंदा : विद्यार्थी
सर्व रा.फ्लॅट नं.१७, सांताक्रुज मेन्शन नं.५, नेहरु रोड, सांताक्रुज पूर्व, मुंबई-४०००५५ महाराष्ट्र — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.राजेश ओमप्रकाश देरा हे दि.१७/०४/२०१९ रोजी मयत झाले आहेत. तसेच त्यांना अर्जदार क्र.१ ही पत्नी तर अर्जदार क्र.२ श्री.भव्य राजेश देरा व अर्जदार क्र.३ श्री.मनन राजेश देरा अशी २ मुले आहेत. हे त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्याच्या खालील घर / फ्लॅट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**घर / फ्लॅट मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट नं. L-१०१, पहिला मजला, रेल विहार को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, खारघर, क्षेत्र ८३.०७ चौ.मीटर कार्पेट एरिया : ८९४ चौ.फुट, ग्राऊंड + ७ फ्लॉवर, सेक्टर ४ मध्ये स्थित, खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र**

श्रीमती.प्रिया राजेश देरा, श्री.भव्य राजेश देरा, श्री.मनन राजेश देरा हे कै.राजेश ओमप्रकाश देरा यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी. मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलामार्फत पुढील तारखेस हजर राहून हरकत घ्याव्यात. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती न आल्यास हे मे.कोर्ट श्रीमती.प्रिया राजेश देरा, श्री.भव्य राजेश देरा, श्री.मनन राजेश देरा यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करेल व ते कै.राजेश ओमप्रकाश देरा यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना मा.न्यायालयामार्फत कायदेशीर वारसदार म्हणून वारस दाखला मंजूर करण्यात येईल.

आज दि.१८/७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## ग्रुप ग्रामपंचायत चिखले

**ता.पनवेल, जि.रायगड सन-२०२२/२०२३**

ग्रुप ग्रामपंचायत चिखले, ता.पनवेल, जि.रायगड हे ग्रुप ग्रामपंचायत चिखले हद्दीतील पुढील विकासकामे करणेकरिता सिलबंद निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | इसारा रक्कम १% | सुरक्षा अनामत ५% | ठेकेदाराचा वर्ग | निविदा किंमत | निविदा पाठविणेची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | मौजे चिखले येथे अंगणवाडी दुरुस्ती करणे. (जिल्हा वार्षिक योजना) | १,००,०००.०० | १०००.०० | ५०००.०० | - | १००.०० | २५/०७/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत |
| २ | मौजे सांगडे प्राथमिक शाळा दुरुस्ती करणे. (जिल्हा वार्षिक योजना) | १,७८,०००.०० | १७८०.०० | ८९००.०० | - | १००.०० | |
| ३ | ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती करणे | ६५,६५२.०० | ६५७.०० | ३२८४.०० | - | १००.०० | |

१) अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दि.२०/०७/२०२२ ते २५/०७/२०२२ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.
२) भरलेल्या सिलबंद निविदा दि.२५/०७/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १२:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
३) आलेल्या निविदा दि.२५/०७/२०२२ रोजी दुपारी ०२:०० वाजता समक्ष उघडण्यात येतील.
४) इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट ग्रुप ग्रामपंचायत चिखले यांचे नावे असावा, अथवा रोखीने.
५) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
६) निविदा किंमत ना परतावा राहील.
७) नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल.
८) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
९) कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.
१०) झालेल्या तांत्रिक मुल्यांकना प्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
११) मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व पंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१२) निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.
१३) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१४) काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.
१५) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.
१६) एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**सुपर्णा सुर्यकांत अडुळकर**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत चिखले**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**नामदेव माया पाटील**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत चिखले**
**ता.पनवेल, जि.रायगड**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## तरुण बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल, सेक्टर ६, येथून नोकरीला जातो असे सांगून घराबाहेर गेलेला २५ वर्षीय रोहित जयवंत जाधव हा घरी न आल्याने तो हरवला असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

सदर तरुणाची उंची पाच फूट, सहा इंच , चेहरा उभट, वर्ण सावळा आहे. तो अंगाने मध्यम असून त्याला हिंदी, मराठी भाषा अवगत आहे. त्याने काळा रंगाचा फुल शर्ट, निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट व पायात सफेद चप्पल घातलेली आहे.या तरुणाबाबत अधिक माहिती असल्यास खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक नवनाथ लवटे यांच्याशी संपर्क साधावा.

## रजिप प्राथमिक शाळा आंबेवाडी येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रायगड जिल्हयाचे खासदार सुनीलजी तटकरे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा तालुका महिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आमदार अनिकेत भाई तटकरे यांच्या सुभेहस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी आंबेवाडी ग्रामपंचायत सरपंच सुरेश दादा महाबळे, रोहा तालुका राष्ट्रवादी पक्षाच्या महिला अध्यक्षा प्रितम पाटील, गीता ताई मोरे, गणेश वाचकवडे, कुमार लोखंडे, अवि पलंगे, सुरेखा पार्टे, राकेश लोखंडे, रुपेश लोखंडे, मंदा पवार, हेमंत मालुसरे, अनिल आयरे, महाडिक, रश्मी परबळकर, व शिक्षक प्रिया पवार,विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

## केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालयात परळीतील दोन विद्यार्थ्यांची निवड

**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

सुधागड तालुक्यातील परळी येथील पियुष धोंडू झोरे व प्रार्थना राजेंद्र गोंधळी या विद्यार्थ्यांची माणगाव तालुक्यातील निजामपूर येथील केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालयात निवड झाली आहे.

हे दोन्ही विद्यार्थी येथील श्री राज एज्युकेशन शाळेत इयत्ता पाचवीत शिकत होते. ग्रामीण भागात राहून पियुष व प्रार्थना यांनी हे यश प्राप्त केले आहे. या विद्यार्थ्यांना शिक्षक अमोल ठोकळ यांनी मार्गदर्शन केले आहे. या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुक केले.

# 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यासाठी मुख्याधिकारी यांची विचारविनिमय बैठक आणि चर्चा सत्र

**दै.रायगड नगरी । माथेरान**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित 'हर घर तिरंगा' अभियान देश भारत सर्वत्र राबविण्यात येणार आहे. माथेरान मध्ये सुद्धा नगरपरिषदे मार्फत हा उपक्रम नगरपरिषद क्षेत्रात राबविण्यात येणार आहे. या अभियान राबविण्यात संदर्भात विचार विनिमय चर्चा व लोकसहभाग वाढविण्यासाठी माथेरान नगरीच्या उत्तम प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी बैठक आयोजित केली होती.यावेळी अधीक्षक दीक्षांत देशपांडे, एपीआय शेखर लव्हे, माजी लोकप्रतिनिधी, शिक्षक वृंद, व्यापारी वर्ग, नगरपालिका कर्मचारी वर्ग यांसह नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.



भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञान नायक, क्रांतिकारक,स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, तसेच स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत राहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना ही कायमस्वरूपी जनमानसात राहावी, या उद्देशाने दैदीप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी दि.११ ऑगस्ट २०२२ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे 'हर घर तिरंगा ' हा उपक्रम देश भारत राबविला जाणार आहे. माथेरान मध्ये देखील या उपक्रमाच्या अनुषंगाने येथील लहान मुलांपासून सर्वांनाच देशाच्या स्वातंत्र्याचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. आणि ही संस्कृती रुजविण्यासाठीच 'हर घर तिरंगा' अभियान राबविले जाणार आहे. याच अनुषंगाने महाराष्ट्र शासन पर्यटन सांस्कृतिक कार्य विभाग शासन परिपत्रकानुसार आणि सूचनांनुसार माथेरान नगरपरिषद हद्दीमध्ये देखील हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने येथील माथेरानच्या उत्तम प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या अध्यक्षतेखाली विचार, विनिमय,चर्चा व लोकसहभाग वाढविण्यासाठीची बैठक मंगळवार दि.१९ रोजी सायंकाळी ठीक ४ वाजता येथील नगरपरिषदेच्या हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी माथेरान मधील लोकप्रतिनिधी पत्रकार मंडळी उपस्थित होती.

# राष्ट्रीय बँकांच्या खासगीकरणाच्या विरोधात बँक कर्मचारी संघटना आक्रमक

**दै.रायगड नगरी । पेण**

राष्ट्रीय बँकांच्या खासगीकरणाच्या विरोधात बँक कर्मचारी संघटनांनी आक्रमक पवित्रा धारण केला आहे. सरकारी बँकांच्या खासगीकरणाला ऑल इंडिया बँक ऑफिसर्स कॉन्फरडेशन संघटनेचा तीव्र विरोध आहे. त्यामुळेच बँकांच्या खासगीकरणाला विरोध करण्यासाठी या संघटनेच्या बँक कर्मचाऱ्यांनी मुंबई ते रायगड अशी जनजागृती यात्रा सुरु केली असून आज ही यात्रा पेण शहरात दाखल झाली.




या जनजागृती यात्रेत स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, आरबीएल बँक,बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र आदि सर्वच प्रमुख सरकारी बँकांचे कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी बँक ऑफ इंडियाचे पेण शाखेचे व्यवस्थापक अजय सावंत यांनी पेण शहरात या यात्रेचे भव्य स्वागत केले.

यावेळी बोलताना ऑल इंडिया बँक ऑफिसर्स कॉन्फरडेशन संघटनेचे अध्यक्ष मनोज वाडणेरकर यांनी म्हटले कि, बँकांच्या खासगीकरणामुळे अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक क्षेत्रांना गंभीर परिणामांना सामारे जावे लागेल. ग्रामीण भागातील कर्ज वितरणावर थेट परिणाम होण्याची भीती देखील मनोज वाडणेरकर यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच बँकांचे खासगीकरण झाल्यास ग्राहकांनी बँकेत ठेवलेल्या ठेवींच्या जोखमीमध्ये देखील वाढ होईल असे त्यांनी म्हटले.

केंद्र सरकारने २०२१ मध्ये बँकांच्या खाजगीकरण विधेयक मंजूर करण्याचा प्रयत्न केला, मात्र जनतेच्या पाठिंब्याने आमच्या ऑल इंडिया बँक ऑफिसर्स कॉन्फरडेशन संघटनेने पुढाकार घेऊन सरकारला हे विधेयक आणण्यापासून रोखले होते. परंतु केंद्र सरकारने बँकांच्या खाजगीकरणाचे हे विधेयक पुन्हा संसदेत मांडण्याची तयारी सुरु केली आहे, त्याला आमचा तीव्र विरोध असून आमच्या संघटनेने ही जनजागृती यात्रा सुरु केल्याची माहिती मनोज वाडणेरकर यांनी यावेळी दिली.

बँक राष्ट्रीयीकरण चा ५३ वे वर्ष साजरा करत आहे. तर दुसरीकडे केंद्र सरकार खाजगीकरण करण्याची तयारी करत आहे. याच कारणामुळे पुन्हा एकदा देशाच्या अर्थ रक्षणासाठी आम्ही रस्त्यावर उतरुन आंदोलन करत आहोत.

देशात महागाई गगनाला भिडली आहे. याचा फायदा भांडवलदार यांना होणार आहे व याच भांडवलदारांना डोळ्यासमोर ठेवून सरकारी बँकांचे खाजगीकरण केले जात असल्याचा आरोप देखील ऑल इंडिया बँक ऑफिसर्स कॉन्फरडेशनचे सचिव निलेश पवार यांनी केला.

सरकारी बँकांचे खाजगीकरण झाल्यास जनतेच्या पैशांवर कुणाचेही नियंत्रण राहणार नाही; भांडवलदार स्वतः च्या फायद्यासाठी त्याचा वापर करतील असेही त्यांनी म्हटले. बँकांच्या राष्ट्रीयीकरण झाल्यामुळे अनेक मुद्रा कर्ज, बचतगट कर्ज, अशा विविध योजना बंद होण्याची भीती देखील त्यांनी व्यक्त केली.

## जीवनगौरव पुरस्काराचा आम्हाला अभिमान : रविंद्र सुर्यवंशी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरणच्या अनेक नागरिकांना जीवनगौरव पुरस्कार कधी मिळा-लेला नाही. परंतू प्रत्येक १७ तारखेला ३ ज्येष्ठांना उरण कोमसाप प्रमाणपत्रासह सत्कार करून गौरविण्यात येते.तो आम्हाला अभिमान वाटतो. असा विचार कार्यक्रमाचे अध्यक्ष रविंद्र सुर्यवंशी यांनी विमला तलाव येथे मांडले.

प्रत्येक महिन्याच्या १७ तारखेला कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप ) व मधुबन कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने उरण शहरातील विमला तलाव (गार्डन)येथे कवी संमेलन भरविले जाते. त्याला सर्व कवी, साहित्यिक यांचा उत्तम प्रतिसादही मिळत असतो. असे सांगत अध्यक्ष रविंद्र सूर्यवंशी यांनी आपले आपले मत मांडून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात यशवंत नथुराम, नारायण भोईर, चंद्रकांत गोखले यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रायगड भूषण प्रा.एल.बी. सूर्यकांत दांडेकर, बाळाराम म्हात्रे, मारुती तांबे, रामदास शेलार यांनी मार्गदर्शन केले. कविसंमेलनात भगवान पोसू, चेतन पाटील, संजय होळकर, अरुण. द.म्हात्रे, भरत पाटील, मारुती तांबे, इ.कवींनी रंगतदार काव्यवाचन केले.

## जिंदाल हॉस्पिटलचा फिरता दवाखाना ठरत आहे गोरगरीब रुग्णांसाठी देवदुत

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील ऐनघर ग्रामपंचायत हद्दीमध्ये जवळ-जवळ १७ वर्षांपासून गोरगरीबांच्या सेवेसाठी कार्यान्वित असलेल्या सुकेळी (ता.रोहा) येथील बी.सी.जिंदाल चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटलमध्ये अत्यंत माफक दरात ऐनघर ग्रामपंचायत हद्दीतील तसेच आजुबाजुच्या परिसरातील रुग्ण चांगल्या पद्धतीत उपचार घेत आहेत.



सध्याच्या महागाईच्या दृष्टिकोनातून नागरिकांना किरकोळ आजारासाठी हॉस्पिटलचा खर्च न परडण्यासारखा असल्यामुळे त्याचप्रमाणे जनतेचे आरोग्य उत्तम रहावे यासाठी जिंदाल कंपनीचे चेअरमन डी.पी.जिंदाल यांच्या प्रयत्नातून बी.सी. जिंदाल हॉस्पिटलमार्फंत फिरता दवाखाना सुरू करण्यात आला. आणि हाच फिरता दवाखाना अनेक गोरगरीबांसाठी देवदुत ठरत आहे. या फिरत्या दवाखान्यामार्फंत अनेक गरीब रुग्णांना यांचा लाभ मिळत आहे. या फिरत्या दवाखान्याची सेवा ही ऐनघर विभागातील सुकेळी, खैरवाडी, वेताळवाडी, ऐनघर, हेदवली, तामसोली, बाळसई, गोडसई, पाटणसई आदिवासी वाडी, वजरोली खांब विभागातील घेरासुरगड, वैजनाथ, ऐनवहाळ, डोलवहाळ, मढाळी आदिवासी वाडी, मुठवली, चिल्हे, तळवली, नडवळी त्याचप्रमाणे सुधागड तालुक्यातील बळाप, राबगाव आदिवासी वाडीवरील रुग्ण या मोफत सेवेचा लाभ घेत आहेत. जिंदाल रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. जयरमण नडार यांच्या मार्गदर्शनाखाली जिंदाल हॉस्पिटल मधील डॉक्टरही फिरत्या दवाखान्याची सेवा देत आ-हेत. या फिरत्या दवाखान्याचा लाभ सर्व नागरिकांनी घ्यावा असे आवाहनही हॉस्पिटल व्यवस्थापनाने केले आहे.

## ग्रुप ग्रामपंचायत वारदोली

**मु.वारदोली पो. चिखले ता. पनवेल जि. रायगड**

### दरपत्रके निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत वारदोली ता.पनवेल, जि.रायगड, यांचे वतीने ग्रु. ग्रा. पं. वारदोली कार्यक्षेत्रात सन २०२२/२०२३ या आर्थिक वर्षात ग्रामनिधी अंतर्गत खालील प्रमाणे कामे करावयाची आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी आपली निविदा व सीलबंद कोटेशन बंद लीफाफ्यात मागविण्यात येत आहेत. दि. २०/०७/२०२२ ते २६/०७/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रा.पं. कार्यालयात सादर करावी. आलेली निविदा दि.२७/०७/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता उघडण्यात येईल या वेळी उपस्थित रहावे एक अगर सर्वच निविदा मंजूर अगर नाकारण्याचा अधिकार सरपंच ग्रामपंचायतीने राखून ठेवण्यात आलेला आहे .

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | निधी | इसारा रक्कम | काम करण्याचा कालावधी | निविदा फॉर्म |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे वारदोली येथील राजेंद्र मिसाळ ते गुड लाईफ कंपनी पर्यत रस्ता कॉक्रिटीकरण करणे. | ३८१७६६/- | ग्रामनिधी | ३८१७/- | ६ महिने | १००/- |
| २ | मौजे बेलवली येथील गणपती घाट दुरुस्ती करणे. | २३७२६८/- | ग्रामनिधी | २३७२/- | ६ महिने | १००/- |
| ३ | मौजे बेलवली येथील परशूराम पाटील ते महेश पाटील यांच्या घरापर्यत रस्ता कॉक्रिटीकरण करणे. | १००५००/- | ग्रामनिधी | १००५/- | ६ महिने | १००/- |
| ४ | मौजे बेलवली येथील काशीनाथ पाटील ते राजेश पाटील यांच्या घरापर्यत रस्ता कॉक्रिटीकरण करणे. | ९५७००/- | ग्रामनिधी | ९५७/- | ६ महिने | १००/- |
| ५ | मौजे बेलवली येथील सुभाष पाटील ते संतोष पाटील यांच्या घरापर्यत रस्ता कॉक्रिटीकरण करणे. | १०७६००/- | ग्रामनिधी | १०७६/- | ६ महिने | १००/- |
| ६ | ताराटेपवाडी येथे साठवण टाकी ठेवण्यासाठी चौथरा बांधणे. | १५००००/- | ग्रामनिधी | १५००/- | ६ महिने | १००/- |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वात कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणचे आहे. त्याचे मुल्यांकनाप्रमाणे बिल अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमाप्रमाणे रुपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपचांयतीस राहील.

**सही/-**
**श्री.श्याम शांताराम पवार**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत वारदोली**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**सौ.संगीता बाळु भुतांबरा**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत वारदोली**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.विजया शिंदे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.९३७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०९/२०२२

कै.श्रीमती.सावित्रीबाई रघुनाथ वाशिवले यांचे वारस
१) श्री.रघुनाथ लक्ष्मण वाशिवले
वय : ७३ वर्षे
रा.बिल्डींग नं.५, एच-३, रुम नं.०४,
श्री हनुमान सी.एच.एस., सेक्टर ०७,
घणसोली-नवी मुंबई ४००७०१
२) श्री.नारायण रघुनाथ वाशिवले
वय : ३६ वर्षे
रा.बिल्डींग नं.५, एच-३, रुम नं.०४,
श्री हनुमान सी.एच.एस., सेक्टर ०७,
घणसोली-नवी मुंबई ४००७०१
३) श्री.सुभाष रघुनाथ वाशिवले
वय : २५ वर्षे
रा.बिल्डींग नं.५, एच-३, रुम नं.०४,
श्री हनुमान सी.एच.एस., सेक्टर ०७,
घणसोली-नवी मुंबई ४००७०१ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

१) या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, कै.श्रीमती. सावित्रीबाई रघुनाथ वाशिवले (मयत) यांचे वारस १) श्री.रघुनाथ लक्ष्मण वाशिवले हे पती, अर्जदार क्र.२ श्री.नारायण रघुनाथ वाशिवले हे मोठा मुलगा व अर्जदार क्र.३ श्री.सुभाष रघुनाथ वाशिवले हे धाकटा मुलगा आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. कै.श्रीमती.सावित्रीबाई रघुनाथ वाशिवले यांचा मृत्यू दि.१८/०१/२०२२ रोजी वासोले, वाई, सातारा येथे गावातील घरी झाला आहे.

**कै.श्रीमती.सावित्रीबाई रघुनाथ वाशिवले यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-**

**अ) मौजे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको लि. व महानगरपालिका पनवेल यांचे हद्दीतील भूखंड क्र.३२, सेक्टर क्र.-आर २, या मिळकतीवर बांधण्यात आलेली इमारत अंबाजी अपार्टमेंट मधील निवासी सदनिका क्र.४०३, चौथा मजला, क्षेत्रफळ १५.०३५ चौ.मी. कारपेट एरिया ही सदनिका मिळकत.**

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून, सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळण्याकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. वरील अर्जदाराशिवाय कोणीही या मिळकतीचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारस दाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्याची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न केल्यास कोणाचीही हरकत नाही असे गृहीत धरुन कोर्ट अर्जदारास वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१५/०७/२०२२ माहे सन रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

सोनावणे साहेब

प्रोसेस जमा रु.५०/- **अर्जदारतर्फे वकील**
सक्सेशन दाखला **ॲड.शुभांगी केदार लाड**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.४६६/२०२२
नि.क्र.१८/ड
ने.ता.३०/०८/२०२२

**कै.जगदीश नगनलाल बोहरा (मयत) यांचे वारस**
**१) श्रीमती.ब्रिजकला जगदीश बोहरा**
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.१७१, एम.जी.रोड, बांठीया बि,
ओल्ड पनवेल, रायगड महाराष्ट्र-४१०२०६
**२) पुर्णिमा जगदीश बोहरा लग्नानंतर**
**पुर्णिमा जयप्रकाश बोहरा**
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.८-३-७८, ओल्ड बिट बाझार, वारणगल, आंध्रप्रदेश, ५०६००२
**३) शीला जगदीश बोहरा लग्नानंतर**
**शीला कृष्णकुमार नंदवाना**
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नंदवाना कॉलनी, निमोदा हरिजी,
निमोदा, कोटा-राजस्थान ३२५२०१
**४) श्रद्धा जगदीश बोहरा लग्नानंतर**
**श्रद्धा प्रितेश बोहरा**
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.१, सिद्धार्थ अपार्टमेंट, नंददीप सोसायटी,
जी.पी.नगर रोड, नंददीप शाळेजवळ, मुंबई,
गोरेगाव (इस्ट) महाराष्ट्र ४०००६३ अर्जदार

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, **कै. जगदीश नगनलाल बोहरा** यांचा मृत्यू **दि.१२/११/१९९६** रोजी सुश्रुषा हॉस्पिटल, दादर येथे झालेला आहे. **कै.जगदीश नगनलाल बोहरा** यांचे नावावर खालील तपशिलात नमूद केल्याप्रमाणे **''द टाटा पॉवर कंपनी लिमिटेड आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड''** यांचे शेअर्स आहेत आणि **युनियन बँक ऑफ इंडिया** या बँकेचे खाते आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**अ) द टाटा पॉवर कंपनी लिमिटेड आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड**

| Folio No. | Company Name | Certificate No. | Distincitve Number (s) | Quan-tity |
|---|---|---|---|---|
| 059364251 | Reliance Industries Limited | 62461422 | 002207641959-002207642258 | 300 |
| H5J0010246 | The Tata Power Company Limited | R-00157399 | 0006514613 To 0006514617 | 5 |
| H5J0010246 | The Tata Power Company Limited | R-00157400 | 0006514618 To 0006514622 | 5 |
| H5J0010246 | The Tata Power Company Limited | R-00157401 | 0006514623 To 0006514627 | 5 |
| H5J0010246 | The Tata Power Company Limited | R-00157402 | 0006514628 To 0006514632 | 5 |
| H5J0010246 | The Tata Power Company Limited | R-00157403 | 0006514633 To 0006514634 | 2 |
| | | | Total Shares | 322 |

**ब) बँकेचे वर्णन**

| बँकेचे नाव | शाखा | अकाऊंट नंबर | शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|
| युनियन बँक | पनवेल | ३४४८०२०१०००८२६५ | ६८,५११.३० |

वरील शेअर्सच्या संदर्भात अर्जदार यांनी वारस / सक्सेशन दाखला मिळणेकरिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस / सक्सेशन दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस / सक्सेशन दाखला प्रदान करण्यात येईल. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.१९/०७/२०२२ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## लायन्सक्लब रोहाच्या अध्यक्षपदी अब्बास रोहावाला यांची निवड

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यात सुमारे ४८ वर्षांची परंपरा असलेल्या लायन्स क्लब रोहा च्या अध्यक्ष पदी अब्बास रोहावाला यांची निवड झाली आहे. मावळते अध्यक्ष नुरूद्दीन रोहावाला यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत अब्बास रोहावाला व त्यांच्या कार्यकारिणी तील सहका-यांना इन्स्टॉललेशन ऑफिसर लायन लिओ मंथन मेहता यांनी पद्ग्रहण शपथ दिली. यावेळी लायन्स च्या डिस्ट्रीक्ट चे प्रदीप सिनकर यांनी लायन्स क्लब रोहा चे सभासदत्व घेतलेल्या डॉ अपूर्व भट, डॉ तुषार राजपूत व लियाकत हाफिज यांना सभासदत्व दिले.

नवनिर्वाचित अध्यक्ष अब्बास रोहावाला यांनी आगामी काळात रोह्यात डॉ भट क्लिनिक यांच्या सहकार्याने सुसज्ञ डायलिसिस सेंटर लायन्स क्लब रोहा च्या वतीने उभे करण्याचा मनोदय व्यक्त केला. तसेच मोतीबिंदू मुक्त रोहा करण्याचा संकल्प असल्याचे सांगितले. यावेळी नियुक्त करण्यात आलेली कार्यकारिणी पुढील प्रमाणे- झोन चेअरपर्सन- नुरूद्दीन रोहा-वाला, उपाध्यक्ष- सौ सुश्मिता शिट्याळकर, भाऊसाहेब माने, सेक्रेटरी डॉ कृष्णा जरग, सहसेक्रेटरी-सौ. अर्चना कटिरा, खजिनदार- पराग फुकणे, सहखजिनदार- सौ.वर्षा सातपुते, संचालक - प्रदीप दामाणी, रविंद्र घरत, शिरिष सातपुते, प्रमोद जैन, मीलन शहा, क्लब प्रशासक- प्रद्युत कुळकर्णी, सभासद समिती- लक्ष्मण शिट्याळकर, मधुमेह समिती- डॉ रूपेश होडबे, कर्करोग समिती- डॉ रोहित क्षीरसागर, पर्यावरण- ॲड हेमंत गांगल, निधी समिती- प्रभातसिंह गिरासे, मार्केटिंग समिती- मितेष कटिरा, जनसंपर्क - सौ.समृद्धी राणे, व्हिजन सेंटर- इल्याझ डबीर, तौसिफ येरूणकर, बुलेटीन संपादक- सैफी रोहावाला, सेवा समिती- जयदेव पवार, टेमर -भावेश दामाणी, टेल ट्विस्टर- रशिदा रोहावाला. मावळते अध्यक्ष नुरूद्दीन रोहावाला यांनी प्रास्ताविक करताना मागील वर्षातील कामाचा आढावा घेतला.



### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# लढवय्यापणा आणि संघर्ष करणारा रामेश्वर : आ. बाळाराम पाटील

## सामाजिक उपक्रमांनी साजरा केला सरपंच रामेश्वर आंग्रे यांचा वाढदिवस

**दै.रायगड नगरी । पनवेल**

काही तरी वेगळ करणारी माणस हे वेगळी असतात त्यांचे ध्येय, तत्व, विचार जरा हटके असतात, त्यामध्ये असे व्यक्तीमत्व असणारे करंजाडे ग्रामपंचायतीचे कार्यतत्पर आदर्श सरपंच रामेश्वर आंग्रे. काही व्यक्तींच्या रक्तातच मुळात लढवय्यापणा आणि संघर्ष करण्याची मोठी ताकद असते. त्यामुळे अशी मंडळी आव्हानाला आव्हान करून सामोरे जातात. यशापयशाची पर्वा न करता सातत्याने मार्गक्रमण करत असतात असे मत सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या वाढदिवसानिमिताने कोकण शिक्षक मतदार संघ आमदार बाळाराम पाटील यांनी व्यक्त केले.



यावेळी कोकण शिक्षक मतदार संघ आमदार बाळाराम पाटील, मा. पंचायत समिती सभापती काशिनाथ पाटील, शेकाप तालुका चिटणीस राजेश केणी, प्रल्हाद केणी, अनिल केणी, राम पाटील, उपसरपंच योगेंद्र कैकाडी, सदस्य मंगेश बोरकर, ग्रामसेववक प्रेमसिंग गिरासे शिरवी समाज, करंजाडे रहिवाशी, महिला सदस्य व ग्रा. सदस्य यांच्यासह जेष्ठ नागरिक, महिला मंडळ, विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील नागरिक उपस्तित होते. करंजाडे ग्रामपंचायतीचे आदर्श सरपंच रामेश्वर आंग्रे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी करंजाडे येथे आर.सी.सी पाण्याची साठवण टाकीचे उद्घाटन आ. बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचबरोबर सी.एस. आर.फंड अंतर्गत टाटा पॉवर कंपनीमार्फत रायगड जिल्हा परिषद शाळेचे सुशोभीकरण तसेच नवीन वर्ग खोल्या बांधण्यात आले. १० टक्के महिला बालकल्याण अंतर्गत सुमारे ७० महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. तसेच आदीवासी बांधवाना वनशेतीसाठी फळ रोपे वाटप करण्यात आली.

यावेळी येथील नागरिकांनी बोलताना सांगितले की, रामेश्वर आंग्रे यांना उदंड आयुष्य लाभावेत तसेच पुढील काळात ते जिल्हा परिषद निवडणूक लढवावी किंवा नगरसेवक व्हावेत असे मत यावेळी नागरिकांनी व्यक्त केले.

करंजाडे येथील रायगड जिल्हा प्राथमिक शाळा करंजाडेमध्ये झालेल्या कार्यक्रमादरम्यान करंजाडे येथील शिरवी समाजाकडून महिलांना कापडी पिशवीचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर साकार अकॅडमीच्या वतीने नृत्य स्पेर्धाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागरिकांनी सरपंच रामेश्वर आंग्रे यांना वाढदिवसानिमिताने शुभेच्छा दिल्या.

## बनावट इन्स्टाग्राम अकाऊंट सुरु करणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा पोलिसांकडून शोध सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात व्यक्तीने नवीन पनवेल भागात रहाणार्या एका ११ वर्षीय मुलीच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम अकाऊंट तयार करुन त्याचा गैरवापर सुरु केल्याचा प्रकार उघडकिस आला आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी बनावट इन्स्टाग्राम खाते तयार करुन त्याचा गैरवापर करणार्या व्यक्तीविरोधात आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणातील बनावट इन्स्टाग्राम अकाऊंट तयार करण्यात आलेली ११ वर्षीय मुलगी नवीन पनवेल भागात आई वडील व लहान भावासह राहण्यास आहे. गत मे महिन्यामध्ये सदर मुलगी आपल्या इमारतीच्या खाली मैत्रिणीसह खेळत असताना, तिच्या नावाने इन्स्टाग्रामवर अकाऊंट सुरु असल्याची माहिती मैत्रिणीने दिली.

त्यामुळे या मुलीने सदर प्रकाराची माहिती आपल्या आई-वडिलांना दिल्यानंतर त्यांनी देखील सदर इन्स्टाग्राम खाते तपासले असता, त्यांच्या मुलीच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम खाते उघडण्यात आल्याचे तसेच त्याच्या डीपीवर त्यांच्या मुलीचा फोटो तसेच तिच्या संपुर्ण कुटुंबियांचे फोटो अपलोड केल्याचे आढळुन आले. तसेच त्या फोटोच्या खाली वेगवेगळ्या कमेंट्स देखील दिल्याचे आढळुन आले.

त्यानंतर अज्ञात व्यक्तीकडुन आपल्या मुलीच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम अकाऊंट सुरु करुन त्यावर त्यांच्या कुटुंबियाचे फोटो अपलोड करुन त्याचा गैरवापर सुरु असल्याचे लक्षात आल्यानंतर या मुलीच्या आई वडिलांनी नवी मुंबई पोलिसांच्या सायबार सेलकडे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवरुन खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणात अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

## उरण येथे दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वितरण शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

आजादी का अमृत महोत्सव अनुषंगाने केंद्र शासनाच्या ए.के.ए.एम. योजनेंतर्गत जिल्हयातील विकास कामांना गती देण्यासाठी अंत्योदय मोहीम राबविण्यात येत आहे. सदर अंत्योदय मोहिमे अंतर्गत रायगड जिल्ह्याची निवड करण्यात आली असून सदर मोहिमेचा एक भाग म्हणून दिव्यांग व्यक्तींना त्यांचे प्रलंबित दिव्यांग प्रमाणपत्रे तातडीने मिळावित यासाठी जिल्हा रुग्णालय अलिबाग मार्फत इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण येथे दिव्यांग प्रमाणपत्र वितरण शिबीर आयोजित करण्यात आले होते. जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड -अलिबाग आयोजित उरण तालुक्यातील दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणा साठी दिव्यांगत्वा चे वैदकीय प्रमाणपत्र वितरण करण्यात आले या शिबिरात अस्थिव्यंग नेत्र विकार व मानसिक आजार याची तपासणी केली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ .सुहास माने, यांच्या मार्गदर्शनाखाली व इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण चे वैदकीय अधिक्षक गौतम देसाई, सहाय्यक अधिक्षक अनिल ठाकूर यांच्या सहकार्याने शिबीर यशस्वी झाले.

## शेकाप वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर सुधागडातील कार्यकर्त्यांची मोर्चेबांधणी

**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

शेतकरी कामगार पक्षाच्या २ ऑगस्टला होणाऱ्या वर्धापन दिनाच्या आयोजनाच्या निमित्ताने जिल्हा चिटणीस मंडळाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे पालीतील गुजराती समाज सभागृहामध्ये आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी शेकापचे नेत्यांनी सुधागड तालुक्यातील शेकाप कार्यकर्त्यांना मार्गदर्शन मार्गदर्शन केले.

मागील वर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर वर्धापन दिनाचे कार्यक्रम रद्द झाले होते. तसेच पक्ष कार्यकर्त्यांची एकत्रित अशी कोणती सभा झाली नव्हती. परिणामी कार्यकर्त्यांच्या मनावर आलेली मरगळ दूर करण्यासाठी यंदाचा वर्धापन दिन प्रचंड उत्साहात आणि जल्लोषात साजरा करायचा हेतू डोळ्यासमोर ठेवून ही बैठक संपन्न झाली. वर्धापन दिनाचा कार्यक्रम कशा प्रकारे राबवायचा याचे मार्गदर्शन विधान परिषदेचे आमदार बाळाराम पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील, आणि जिल्हा चिटणीस आस्वाद पाटील , नृणाल पाटील, रा. जि. प. सदस्य सुरेश खैरे यांनी तालुक्यातील कार्यकर्त्यांना केले.

यावेळी सुधागड तालुका सरचिटणीस उत्तमराव देशमुख,पाली नगरपंचायत उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, पाली नगरपंचायत बांधकाम सभापती प्रणाली शेळके, आरोग्य सभापती विनायक जाधव, परळी ग्रामपंचायत सरपंच संदेश कुंभार, उपसरपंच नरेश खाडे व राजाराम देशमुख, यांच्यासह शेतकरी कामगार पक्षाचे सरपंच ग्रामपंचायत सदस्य पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय

**रायगड पाटबंधारे विभाग क्र.-२ (बांधकाम), कोकण भवन, नवी मुंबई**

ई-मेल पत्ता : rid2dnkb@gmail.com, दूरध्वनी क्रमांक : (०२२)-२७५७६४३७

**दरपत्रक सुचना क्र.03**

कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग क्र.२ (बांधकाम), ब्लॉक क्रमांक ३०२, तिसरा मजला, कोंकण भवन, नवी मुंबई, दुरध्वनी क्रमांक ०२२-२७५७६४३७, हे खालील दर्शविलेल्या कामाकरिता इच्छुक पुरवठादारांकडून मोहरबंद लखोट्यात दरपत्रके दि.२२/०७/२०२२ ते दि.२९/०७/२०२२ पर्यंत मागवित आहेत. इच्छुक पुरवठादारांकडून मोहोरबंद लखोट्यात आपले कमीत कमी दर नमूद करून दरपत्रके या कार्यलयास दि.२९/०७/२०२२ पर्यंत ठिक दु.३.०० वाजेपर्यंत पोस्टाने अथवा समक्ष हस्तेपोहोच पोहोचतील अशा बेताने पाठवावीत. तद्नंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | ३०/३१ दिवस/ २००० कि.मी. |
|---|---|---|
| १ | उप-विभागीय अधिकारी जलसंपत्ती सर्वेक्षण व अन्वेषण, उपविभाग, कोलाड, ता.रोहा यांना दि.०१/०८/२०२२ ते दि.३०/०६/२०२३ (एकूण ११ महिने) या कालावधीकरिता अधिकारी यांना कार्यक्षेत्रावर व इतर कार्यालयीन कामकाजाकरिता जाणे-येणे करिता स्कॉर्पिओ / बोलेरो / सुमो वाहन भाडे तत्वावर पुरविणेचे काम. वरील कालावधीमध्ये स्कॉर्पिओ / बोलेरो / सुमो वाहन संबंधित उपविभागीय अधिकारी यांचे आवश्यकतेनुसार व वेळेत पुरविणे आवश्यक आहे. | सर्व कर व देखभाल खर्च सहीत |
| २ | ३०/३१ दिवस/२००० कि.मी. नंतरचे दर (सर्व कर व देखभाल खर्च सहीत) | प्रती कि.मी. दर |

अटी व शर्ती :-

१) पुरवठा करावयाचे वाहने ही सुस्थितीत असावे

२) वरील कामाकरिता जीपचे दर प्रति महिन्याकरिता ठोक रक्कम याप्रमाणे सर्व करासह नमूद करावेत.

३) वरील काम ठेकेदाराने आपले स्वतःचे जबाबदारीवर करावयाचे आहे. त्याकरिता अपघात सुरक्षितता (विमा इत्यादी) काढण्याची जबाबदारी पुर्णपणे ठेकेदारास घ्यावी लागेल.

४) शक्य झाल्यास दरपत्रके दि.२९/०७/२०२२ रोजी सायं.०४.०० वा. उघडण्यात येतील.

५) वरील कालावधीत जीपचा इंधन देखभाल दुरुस्ती इत्यादी कामे संबंधित ठेकेदाराकडून स्वतः कार्यालयीन कामकाजात कोणताही अडथळा न आणता करावयाची आहेत.

६) अनुदानाच्या उपलब्धतेअभावी कामाचे देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्याबाबत कोणतीही नुकसान भरपाई अथवा व्याजाची मागणी करता येणार नाही.

७) वरील कालावधीत शासकीय निरिक्षण वाहन उपलब्ध झाल्यास वाहन पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

८) वरीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झाल्यानंतर एखादी अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकारी निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

**स्थळ प्रत मा.का.अ.यांनी मान्य केली आहे.**

जा.क्र.रापावि-२/भांशा/११५९/सन २०२२
रायगड पाटबंधारे विभाग क्र.२ (बांधकाम)
कोंकण भवन, नवी मुंबई
दिनांक : १४/०७/२०२२
क्र.जिमाका/राअ/जाहिरात/७५/१३०७/२०२२

**सही/-**
**उपकार्यकारी अभियंता**
**रायगड पाटबंधारे विभाग क्र.२ (बांधकाम)**
**कोंकण भवन, नवी मुंबई**


## मांडला प्राथमिक शाळेत शालेय साहित्य वाटप

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील मांडला गावाचे सुपुत्र चेतन आष्टीवकर व स्वप्नील नांदगावकर यांनी सामाजिक सेवेची जाण लक्षात घेऊन रायगड जिल्हा परिषदेच्या मांडला प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आल्याने विद्यार्थी व पालक वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या मराठी मांडला शाळेतील ३० विद्यार्थ्यांना चेतन आष्टीवकर व स्वप्नील नांदगावकर यांच्यातर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये वह्या पेन पेन्सिल चित्रकला वह्या व स्कूल बॅग इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप ग्रामपंचायत सरपंच सुचिता सुरेश पालवणकर, ग्रामपंचायत सदस्य धर्मेंद्र गायकवाड, बशीर गोरमे, अनिता नांदगावकर, दत्तात्रेय नागावकर, तंटामुक्तगांव अध्यक्ष व शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालकवर्ग यांच्या उपस्थितीत शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका समीक्षा सुरेश नांदगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली महेश कवळे, रमाकांत ठाकूर, अस्मिता भगत यांच्या सहकार्यातून शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकीतून केलेल्या मदतीचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात येत आहे.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महेश कवळे यांनी तर रमांकात ठाकूर यांनी आभार मानले.

## 'हर घर तिरंगा' उपक्रमाच्या नियोजनात कर्जतकरांचा उत्साह

**दै.रायगड नगरी । कर्जत**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर 'हर घर तिरंगा' उपक्रम कर्जत नगरपरिषदेच्या माध्यमातून करण्यासाठी नियोजन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कर्जतकरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून हा उपक्रम चांगल्या प्रकारे यशस्वी करण्याचा निर्धार केला.

नगरपरिषदेच्या सभागृहात नियोजन सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, नगर-सेवक, नगरसेविका उपस्थित होत्या. मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात 'स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवा निमित्त जनतेच्या मनात लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात. स्वतंत्र संग्रामातील अज्ञान नायक, क्रांतिकारक, स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटनांचे समरण व्हावे. तसेच स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम ठेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात राह-ावी. या उद्देशाने दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक स्मरण करण्यासाठी येत्या दि.११ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे ' हर घर तिरंगा' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. असे आवाहन केले.

या प्रसंगी जेष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष अच्युत कोडगिरे यांनी 'हा उपक्रम करताना संस्था, विद्यालये आदींनीही बरोबर घ्यावे. आमच्या संस्थेकडून सर्वतोपरी सहकार्य राहील.' असे आश्वासन दिले. निवृत्त मुख्याध्यापक दामोदर शहासने यांनी, 'हा उपक्रम करताना निधीची आवश्यकता लाभेल त्यासाठी शहरातील व्यापारी संघटना, दानशूर व्यक्ती, संस्था आदींकडून निधी उपलब्धतेसाठी प्रयत्न करावेत. तसेच दुर्गम भागात वाडी वस्तीवर देखील हा



उपक्रम होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.' असे सूचित केले. नगरसेवक बळवंत घुमरे यांनी, 'राखी पौर्णिमा, दही हंडी आदी सण या कालावधीत येतात. त्यासाठी तिरंगी रंगाचा वापर केल्यास एक वेगळेच महत्व प्राप्त होईल. असे सांगितले.

माजी नगराध्यक्ष राजेश लाड यांनी, 'आपण स्वातंत्र्याच्या संबंधी अनेक उपक्रम राबवतो परंतु त्यासाठी किती लोकप्रतिनिधी व नगरसेवक उपस्थित राहतात? हे सुद्धा पाहिले पाहिजे. सर्वांनीच सहभाग घेतल्यास स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव चांगल्या प्रकारे साजरा होईल.' असे सांगितले. जितेंद्र ओसवाल यांनी, 'अमृत महोत्सवाच्या निमित्ताने ७५ वर्षांवरील नागरिकांचा सन्मान करावा.' असे सुचविले. विजय मांडे यांनी, 'आम्ही पत्रकार संघाच्या वतीने गेली १८ वर्षे १४ ऑगस्ट च्या मध्यरात्री १२ वाजून ०२ मिनिटांनी ध्वजारोहण करतो. या उपक्रमातही आम्ही सहभागी होऊन ला-गेल ते सहकार्य करू.' असा शब्द दिला. रोटरी क्लबचे अध्यक्ष सतीश श्रीखंडे यांनी, 'सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनी , 'ध्वज वाहनांसाठी लागणारे ध्वज नगरपरिषदेकडून उपलब्ध करून देण्यात येतील. मात्र कोणत्याही परिस्थितीत ध्वजाचा अपमान होणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी. या कालावधीत विविध समारंभाचे आयोजन करण्यात येईल. त्यासाठी संस्थांच्या सहकार्याची आवश्यकता आहे.' असे स्पष्ट केले. सूत्रसंचालन रवींद्र लाड तर आभार प्रदर्शन मुख्याधिकारी भणगे यांनी केले.

या प्रसंगी जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष सुभाषचंद्र नातू, कृष्णा लाड, सुरेश कुरतडकर, माजी नगराध्यक्ष रजनी गायकवाड, अश्विनी दिघे, बिनीता घुमरे आदींसह शहरातील विद्यालयांचे शिक्षक, बचत गटाच्या महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.